# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई

दि. १५.०४.२०१७

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय :— श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाचा महाप्रसाद भोजन बनविण्याच्या कंत्राटाकरीता दरपत्रक.**

वरील विषयात नमूद बाबींचा जेवन बनविण्याचे कामाचे कंत्राटा करीता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. जेवन बनविण्याची यादी सोबत परिशिष्ठ 'अ' येथे जोडली आहे. या संदर्भात अधिक माहितीची आवश्यकता असल्यास न्यासाचे सहा. पर्यवेक्षक, श्री. जनार्दन शिरवडकर यांच्याशी संपर्क साधावा.

**अटी व शर्ती :—**

१) परिशिष्ट 'अ' येथे नमूद भोजन बनविण्याचे कामाचे दरपत्रक स्विकारल्यानंतर **६ महिन्याच्या कालावधीसाठी** काम करणे आवश्यक आहे.
२) परिशिष्ट **अ** येथे दर स्वतंत्रपणे नमूद करणे आवश्यक आहे.
३) भोजन बनविण्याच्या मजूरीमध्ये वाढ झाली तरी दरपत्रकात नमूद दर हे ६ महिने किंवा त्या पुढील दरकरार होईपर्यत कायम राहतील.
४) प्रत्येक कंत्राटदाराने फक्त १ दरपत्रक सादर करावे.
५) कंत्राटदाराने VAT/CST क्रमांक दरपत्रकात नमूद करावा.
६) कंत्राटदाराने VAT/CST क्रमांक लागू नसल्यास, तत्सम प्राधिकरणाकडीत नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे व दरपत्रके सादर करतांना पॅन कार्डची दुय्यम प्रत सोबत जोडावी.
७) भोजन बनविण्याकरीता लागणारा कच्चा माल, भांडी, गॅस शेगडी व गॅस न्यासातर्फे कंत्राटदारांना पुरविण्यात येतील.
८) भोजनाच्या संपूर्ण पूर्वतयारीसह भोजन बनविणे. जेवण बनविण्यापूर्वीची सर्व तयारी ( उदा.तांदूळ, डाळ, भाजी साफ करणे / निवडणे, भाजी चिरणे, भोजन वाढणे, ताट धुणे, चपाती करणे इ.) ही कामे न्यासाचे कर्मचारी करतात.
९) कंत्राटदाराला देयकाची रक्कम फर्मच्या नावे आरटीजीएसच्या मार्फत अदा करण्यात येईल.
१०) सिलबंद लखोटयावर दरपत्रक सूचना दिनांक व सूचनेत नमूद विषयाचा उल्लेख करण्यात यावा.
११) दरपत्रके सिलबंद लखोटयात **सोमवार, दि. २४.०४.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यत** न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील नोंदणी शाखेत सादर करावीत.
१२) **सोमवार, दि. २४.०४.२०१७ रोजी दुपारी २.००** वाजता तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंत्राटदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी कृपया उपस्थित रहावे.

( रवि जाधव )
उप कार्यकारी अधिकारी

## परिशिष्ट 'अ'

### १) जेवण व अल्पोपहार

| अ.क्र. | तपशील | अंदाजे व्यक्ती | पदार्थ | दैनंदिन मजुरीचा दर |
|---|---|---|---|---|
| १ | दुपारचे जेवण (बुधवार ते सोमवार) | १७५ ते २०० | भात, वरण, आमटी, भाजी, चपाती. | |
| २ | दुपारचे जेवण ( मंगळवार ) | २२५ | भात, वरण, आमटी, भाजी, चपाती, गोड शिरा | |
| ३ | सत्यनारायण महापुजेकरिता शिरा | मंदिरात मंगळवार, संकष्टी चतुर्थी व एकादशी व्यतिरिक्त ३ ते ५ सत्यनारायण महापुजा | प्रसाद (शिरा) उदा. १ पूजा = प्रत्येकी १ किलो रवा, गायीचे तुप, साखर. | |
| ४ | सकाळी कॅश काउंटींग करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता | दर सोमवारी (८० व्यक्ती) | अल्पोपहार | |
| ५ | न्यास व्यवस्थापन समितीच्या बैठकांच्या वेळी भोजन | २० व्यक्ती | भात, मसाले भात किंवा पुलाव, आमटी, भाजी, भजी, चपाती, पापड, कोशींबिर किंवा सलाड व एक गोड पदार्थ | |
| ६ | दर विनायकी चतुर्थीला न्यासाचे पुजारी यांच्याकरीता | २० व्यक्ती | सकाळचा अल्पोपहार व मंगळवारी रात्रीचे जेवण | |
| ७ | न्यासाचे अधिकारी, कर्मचारी, सेवेकरी यांच्याकरीता | सकाळी व संध्याकाळ १५० ते १७५ व्यक्ती | चहा | |

### २) हवन जेवण व अल्पोपहार

| अ.क्र. | तपशील | अंदाजे व्यक्ती | पदार्थ | दैनंदिन मजुरीचा दर |
|---|---|---|---|---|
| १ | हवन पूजेच्या यजमानांकरिता विशेष जेवण व दुपारचे जेवण | २५ + २०० | भात, मसाले भात किंवा पुलाव, पुरी, वरण, आमटी, भाजी, भजी, चपाती, ताक, पापड, कोशींबिर, एक गोड पदार्थ (उदा.जिलेबी, शेवयाची खिर,शिरा,मुग डाळ हलवा) | |
| २ | हवन पुजेच्या यजमानांसाठी | ३५ व्यक्ती | सकाळचा नाश्ता व चहा | |

### ३) तळलेले मोदक

| अ.क्र. | तपशील | अंदाजे व्यक्ती | पदार्थ | दैनंदिन मजुरीचा दर |
|---|---|---|---|---|
| १ | छोटे तळलेले मोदक | १२०० | हवन पूजेमध्ये पुर्णाहुतीत अर्पण करण्याकरीता छोटे तळलेले मोदक | |